ज्योतिषविषयक
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४

दैनिक सोलापूर
सायं कटूसत्य
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६१ वा | सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# छत्रपती शिवरायांच्या अपमानाचे कोश्यारीला बक्षीस?

## पद्मभूषणावरून काँग्रेससह सर्वच स्तरातून भाजप-संघावर जोरदार हल्लाबोल

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** ''रामदास नसते तर छत्रपती शिवरायांना कोणी विचारले असते?' अशी वादग्रस्त आणि इतिहासाचा अपमान करणारी मुक्ताफळे उधळणाऱ्या माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना भाजप सरकारकडून पद्मभूषण देण्यात आले आहे. हा सन्मान नसून महाराष्ट्राच्या स्वाभिमानावर घाला आहे,'' असा घणाघाती आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळल्यानंतरही भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कोश्यारी यांची पाठराखण केली होती. आता त्यांनाच पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने हा निर्णय म्हणजे ''छत्रपती शिवरायांच्या अपमानाचे बक्षीस'' असल्याची टीका सपकाळ यांनी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ''छत्रपती शिवाजी महाराज हे कोणाच्या कृपेने घडलेले नव्हते, तर त्यांच्या पराक्रमाने, दूरदृष्टीने आणि जनतेच्या पाठबळावर उभे राहिलेले स्वराज्याचे शिल्पकार होते. त्यांचे महत्त्व कमी लेखणाऱ्या व्यक्तीला सर्वोच्च नागरी पुरस्कार देणे म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेवर आघात आहे.''

ते पुढे म्हणाले, ''भाजप आणि संघाला जर खरोखर छत्रपती शिवरायांबद्दल आदर असेल, तर कोश्यारी यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करून त्यांची माफी मागायला लावली पाहिजे होती. मात्र तसे न करता त्यांना पद्मभूषण देऊन शिवप्रेमी महाराष्ट्राच्या भावनांची थट्टा करण्यात आली आहे.''




या पुरस्कारामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, शिवप्रेमी संघटना आणि विरोधी पक्षांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. काँग्रेसने या निर्णयाचा निषेध करत केंद्र सरकारकडे पुरस्काराचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, भाजपकडून अद्याप यावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली, तरी हा सन्मान ''संघनिष्ठांना दिलेले बक्षीस'' असल्याची टीका विरोधकांकडून जोर धरू लागली आहे. आगामी काळात या मुद्द्यावरून राज्यात आंदोलन छेडले जाण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

कोश्यारी यांनी ''सावित्रीबाई फुले १० वयोगटात लग्न झाल्या होत्या आणि त्यांचे पती ज्योतिराव फुले १३ वर्षांचे होते. आता विचार करा की त्या वयातील मुलगा-मुलगी लग्नानंतर काय करत असतील किंवा काय विचार करत असतील?'' असा प्रकारचा प्रश्न त्यांनी हसत-हसत विचारला होता.

या वक्तव्यावरून: सामाजिक, पुरोगामी व बहुजन संघटनांनी, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांच्यासह अनेक विरोधी पक्षांनीतीव्र निषेध नोंदवून.''महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतीचे आधारस्तंभ असून त्यांच्या योगदानाबाबत अवमानकारक विधान सहन केले जाणार नाही,'' अशी भूमिका मांडली होती. अशा वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीला एवढा मोठा पुरस्कार देऊन महाराष्ट्रातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळले आहे.

# बेकायदेशीर वैयक्तिक मान्यतांमधून कोट्यवधींचा घोटाळा; लेबर पार्टीचा आरोप

## भ्रष्ट शिक्षणाधिकाऱ्यांचे १५० पुरावे एस.आय.टी.कडे सादर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रकरणांना गेली दहा वर्षांहून अधिक काळ न्याय न मिळाल्याने आता शिक्षण विभागातील कथित भ्रष्टाचार उघडकीस येऊ लागला आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांनी पदाचा गैरवापर करून शासन निर्णय धाब्यावर बसवत तब्बल १५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना बेकायदेशीर वैयक्तिक मान्यता दिल्याचे गंभीर आरोप लेबर पार्टी महाराष्ट्र प्रदेशने केले असून, यासंदर्भातील १५० पुरावे विशेष तपास पथकाकडे (S.I.T.) सादर करण्यात आले आहेत.

सोलापूरमधील खाजगी शाळामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकरणे विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सोलापूर कार्यालयात गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. या अन्यायाविरोधात लेबर पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या पुतळ्याचे दहन आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आलाहोता. या आंदोलनाची दखल घेत


विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे

(पान २ वर)












# संपादकीय

## फुकटखाऊ राजकारण : विकासाचा शत्रू आणि देशाचा आर्थिक सापळा

भारताच्या राजकारणात सध्या जे काही सुरू आहे, ते केवळ निवडणूक जिंकण्याचं तंत्र नाही ती देशाला आर्थिकदृष्ट्या उध्वस्त करण्याची सरकारी ब्लूप्रिंट ठरत चालली आहे. 'फुकट' या शब्दाभोवती फिरणाऱ्या योजना आता अपवाद राहिलेल्या नाहीत, तर त्या राजकारणाचं मुख्य शस्त्र बनल्या आहेत. मोफत वीज, मोफत भत्ते, मोफत सुविधा, मोफत वाटप हे सगळं लोककल्याणासाठी नसून मतांची उघड लिलावबाजी आहे.

एक काळ होता, जेव्हा नोटा बदलून अर्थव्यवस्था सुधारण्याचे प्रयोग झाले. आज त्या नोटांची जागा घेतली आहे 'मोफत योजना' या नव्या चलनाने. तत्त्व स्पष्ट आहे. जोडा मत, मोडून काढा अर्थव्यवस्था. देश स्वतःच्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न करतोय, पण प्रत्येक निवडणूक त्याच्या पायात घातलेली नवी बेडी ठरत आहे. भारताचा आर्थिक प्रवास जणू एखाद्या ट्रेनला आधी ब्रेक लावून, नंतर हाताने मागे ढकलल्यासारखा झाला आहे. सरकारांच्या तिजोरीत एकामागोमाग एक खड्डे पडत आहेत. हे खड्डे म्हणजे विकासाचे नव्हेत, तर भविष्यात न भरून निघणाऱ्या आर्थिक कबरी आहेत. अधिक स्पष्ट सांगायचं तर, निवडणूक जिंकण्यासाठी देश स्वतःला अर्थव्यवस्थेच्या शवपेटीत ठेवतो आहे.

आज बेरोजगारी इतक्या भयानक टप्प्यावर पोहोचली आहे की तरुणांच्या डोळ्यांत स्वप्न उरलेली नाहीत. उरली आहे ती फक्त अर्ज भरण्याची सवय ''कुठे काही फुकट मिळतंय का?'' हा युवा भारत आहे की सरकारी अनुदानाचा ग्राहक? आपण स्वावलंबी पिढी घडवतोय की भिक्षेकरी मानसिकता रुजवतोय?

ज्या देशाने रोजगार निर्माण करायला हवेत, तो देश अनुदान तयार करतो आहे. ज्या देशाने उद्योग आकर्षित करायला हवेत, तो देश फुकट योजना जाहीर करण्यात गुंतला आहे. उत्पादन वाढवण्याऐवजी 'वोट बदल्यात लाभ' या खालच्या पातळीवर राजकारण उतरलं आहे. अर्थव्यवस्था ही हवेत चालत नाही. ती चालते कामगारांच्या श्रमातून, शेतकऱ्यांच्या घामातून, करदात्यांच्या पैशातून आणि उद्योगांच्या जोखमीमधून. पण हे मूलभूत सत्यच लोकांना विसरायला लावलं जात आहे. त्याऐवजी दिली जाते 'मोफत' नावाची एक धोकादायक नशा. ही नशा लोकांना कामापासून दूर नेते. ही नशा श्रमाचे मूल्य विसरायला लावते. ही नशा तरुणांना दिशाहीन करते. ही नशा कर्जाचा डोंगर उभा करते. ही नशा उद्योगांना देशाबाहेर पळायला भाग पाडते. आणि शेवटी ही नशा अर्थव्यवस्थेला लाईफ-सपोर्टवर ठेवलेला रुग्ण बनवते.

ग्रामीण भारत या सगळ्यात सर्वाधिक होरपळतो आहे. रस्ते नाहीत, आरोग्य केंद्र नाहीत, शाळा नाहीतपण निवडणूक आली की अनुदानाचा धबधबा सुरू होतो. हा धबधबा विकासाचा नाही; तो फसवणुकीचा आहे. पाऊस थांबला की जमीन कोरडी, योजना थांबली की उपासमार. असा विकास म्हणजे केवळ फजितीचा फार्स.

आज लोकशाहीचे प्रत्येक आधारस्तंभ, निवडणूक आयोग, न्यायसंस्था, प्रशासकीय यंत्रणासंशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. विश्वास तुटला की जनता विकत घेणं सोपं होतं, आणि त्याचाच फायदा फुकटखाऊ राजकारण घेत आहे.

राजकारणी इतक्या बेमुर्वतपणे वागत आहेत जणू विचारत आहेत ''देशाचं काय होतंय, आम्हाला त्याचे काय?'' मत मिळालं की त्यांची गाडी पुढे जाते; देश आर्थिक अंधारात गेला तरी फरक पडत नाही. फरक पडायला हवा जनतेला. पण जनता जशी अनुदानाच्या व्यसनात अडकते, तसा प्रश्न विचारण्याचा स्वभाव मरतो.

''काम नाही, पण मोफत मिळतंय ना!'' या एका वाक्यातूनच देशाच्या विनाशाची सुरुवात होते. इतिहास साक्षी आहे. विकासापेक्षा मोफत पणाला महत्त्व देणारे देश टिकत नाहीत. श्रीलंकेचं उदाहरण डोळ्यासमोर आहे. आज जे काही एखाद्या राज्यात दिसतंय, ते उद्या संपूर्ण देशाच्या हाडांमध्ये मुरू शकतं.

जर हा देश वाचायचा असेल, तर एक गोष्ट स्पष्ट आहे. फुकटखाऊ राजकारणाचा अंत झाला पाहिजे. कारण विकास हा पर्याय आहे; फुकटखाऊपणा हा विनाशाचा मार्ग आहे.

* पान १ वरुन *

*** बेकायदेशीर वैयक्तिक मान्यतांमधून कोट्यवधींचा घोटाळा...**

विभागाचे डॉ. गणपत मोरे यांनी लेबर पार्टीचे प्रदेश अध्यक्ष साथी बशीर अहमद यांच्याशी संपर्क साधत दि.२१ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे बैठक आयोजित केली होती. या बैठकीत सोलापूर येथील आदर ऊर्दू प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षक (मयत) सय्यदमुदस्सरअली हाश्मी, पंडित जवाहरलाल नेहरू ऊर्दू प्राथमिक शाळेतील शिक्षिका श्रीमती नसीम समदानी तसेच अतिरिक्त शिक्षकेत्तर कर्मचारी महेबूब रशीद शेख यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. या प्रकरणांवर १५ दिवसांत निर्णय घेण्याचे आदेश डॉ. गणपत मोरे यांनी दिले.

**शासन निर्णय धाब्यावर, कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार**

लेबर पार्टीने केलेल्या आरोपानुसार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सोलापूर कार्यालयाकडून उच्च न्यायालय, स्थानिक न्यायालय, शासन निर्णय तसेच वरिष्ठ कार्यालयांचे आदेश सातत्याने डावलले जात आहेत. कायदेशीर कामांना जाणीवपूर्वक विलंब लावून बेकायदेशीर कामांना भ्रष्ट मार्गाने प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दि.२ मे २०१२ च्या शासन निर्णयानुसार भरती बंदी असताना, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व (माध्यमिक) यांनी पदाचा गैरवापर करून १५० वैयक्तिक मान्यता दिल्या. प्रत्येकी मान्यतेसाठी ३ ते ५ लाख रुपये घेतल्याचा गंभीर आरोप असून, या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचे वेतन काढून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचा दावा लेबर पार्टीने केला आहे.

या सर्व बेकायदेशीर मान्यतांबाबतचे कागदपत्रीय पुरावे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांच्यासमोर सादर करण्यात आले असून, याबाबत सविस्तर चर्चा देखील झाली असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी विभागीय आयुक्त तथा एस.आय.टी.चे अध्यक्ष चंद्रकांत पुलकुंडवार (पुणे) यांच्याकडेही १५० पुराव्यांसह तक्रार दाखल करण्यात आली आहे. या कथित घोटाळ्यात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, तत्कालीन शिक्षणाधिकारी जितेंद्र खंडागळे, तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भास्कर बाबर तसेच जिल्हा परिषद सोलापूरच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती स्मिता पाटील (माध्यमिक शिक्षणाधिकारी पदाचा प्रभारी कार्यकाळ) यांच्या काळातील वैयक्तिक मान्यतांचा समावेश असल्याचा आरोप आहे.

न्याय न मिळाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला असून, शिक्षण विभागातील भ्रष्टाचारावर कठोर कारवाईची मागणी केली आहे, अशी माहिती लेबर पार्टीचे प्रदेश अध्यक्ष साथी बशीर अहमद यांनी दिली. या बैठकीस लेबर पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष साथी बशीर अहमद, सौ.सत्यव्वा गायकवाड, सौ.रेखा गायकवाड, महेबूब शेख, कॉ.मुस्ताक शेख, नौशाद शेख आदी उपस्थित होते.

# गणराज्य दिनाचा योग्य सन्मान राखावा.

भारतातील लोकशाहीचा उगम शोधायचा झाला तर अडीच हजार वर्षे मागे जाणे अपरिहार्य ठरते. मानवधर्मच श्रेष्ठ आणि प्रमाण मानणारे तथागत गोतम बुद्धांनी आपल्या काळात जनमताला नेहमीच महत्व दिले. जनतेच्या कल्याणासाठी एखादी यंत्रणा असणे गरजेचे असते.त्यात प्रत्येकाला वैयक्तिकरित्या सहभाग नोंदविणे शक्य नसते म्हणून एक ठराविक गण संख्याबळासाठी एक गणपती अर्थात प्रतिनिधी निवडून त्यांच्या वतीने जनतेसाठी राज्यशकट हाकायची एक पारदर्शक यंत्रणा त्याकाळी अस्तित्वात आणली. त्यालाच गण पद्धती म्हटले जायचे. आज ग्रामपंचायती पासून संसदे पर्यंत प्रतिनिधी निवडायची जी संसदिय प्रणाली अस्तित्वात आहे त्याची मूळ कल्पना तथागत बुद्ध कालीन गणराज्य पद्धतीतील आहे . संविधानाचा मूळ गाभाच तथागत गोतम बुद्धांच्या मानवतावाद समता, समानता आणि विश्वबंधुत्व असा आहे. आणि हीच समता आणि समानता नको असणारे, विषमतावादी विचारसरणी मान्य असलेले,धर्माची भोंदूगिरी करून ग्रह-तारे,देव- देवता, मंगळ-शनी आदींची अनामिक भीती दाखवून सर्व सामान्य जनतेला अमर्याद सत्तेच्या जोरावर स्वातंत्र्यपूर्व काळातील कायदे आणि प्रथेनुसार आपल्या टाचेखाली ठेवण्याची मनिषा बाळगणारे आज सतत संविधानाची समीक्षा करण्याच्या नावाखाली या देशातील विविध धर्म,जाती त्यांच्या रूढी परंपरा, भाषा, संस्कृती आदींचे स्वातंत्र्य अबाधित राखून सार्वभौम राष्ट्राचे ऐक्य एका समान सूत्रात बांधण्याचे सामर्थ्य असलेले जगातील एक आदर्शवत असे भारतीय संविधान बदलण्याचे षडयंत्र करत आहेत. काही दिवसांपूर्वी तरडे नावाचा स्वतःला कलावंत म्हणवून घेणारा हीन विचाराचा माणूस गणपतीसमोर आरास करण्याच्या नावाखाली संधी साधुन गणपतीच्या आजूबाजूला कथा, कादंब-या आदी सुमार पुस्तकांची मांडणी करून दोन्ही खांद्याच्या बाजूला धार्मिक पुस्तकांची तर मस्तकावर मनुस्मृती सारखी कलंकित पुस्तकांची मांडणी करत अगदी खाली म्हणजे भारतीय संविधान ठेवून त्यावर पाट मांडून गणपतीची मूर्ती बसवला होता. हा काही सहज नकळत घडलेला प्रकार नव्हता. समस्त बहुजनांचा राजा बळीराजाच्या मस्तकावर पाय ठेवून वामनाने कपट रितीने पाताळात गाडलेल्या प्रसंगाच्या आठवणींना उजाळा करून देण्याचा खोडसाळपणा होता.आणि विशेष म्हणजे ही बातमी फोटोंसह सगळीकडे प्रसिद्ध झाली तरीही या झाल्या प्रकारचा म्हणावा तसा निषेध नोंदवला गेला नाही.या उलट संविधानाचा सन्मान करत फुले शाहू आंबेडकरांचे विचार जनमानसात रुजविणा-या किरण माने या हरहुन्नरी कलावंताने केलेले वक्तव्य झोंबल्यामुळे त्याला कैणतीही पूर्वसूचना न देता अथवा त्याला आपली स्वतःची बाजू मांडण्याची संधी न देता गाजत असलेल्या दूरचित्रवाणीच्या मालिकेतून तडकाफडकी हटविण्यात आले होते.

असे आदर्शवत भारतीय संविधान अगदी संसद आणि सर्व सभेपुढे संविधानावर माथा टेकवणा-या प्रधानमंत्रीच्या निवासापासून हाकेच्या अंतरावर जाळण्याचे प्रकारही करुन झाले आहेत.

भारतीय संविधान लागू झाल्यानंतर वर उल्लेख केल्यानुसार सर्वांसाठी कायदे निर्माण झाले.आणि कायद्यासमोर सर्व समान ही नैसर्गिक न्यायाची व्याख्या अस्तित्वात आली त्यामुळे मनुस्मृतीच्या कायद्यानुसार विशेष श्रेष्ठत्व आपल्याकडे ठेवणा-यांच्या विशेषत्वाचे अस्तित्वच संपुष्टात आले. आणि हीच तर इथल्या प्रस्थापितांची खरी पोटदुखी आहे. असो!

आपला देश जरी १९४७ ला स्वतंत्र झाला असला तरी ते स्वातंत्र्य देण्यापूर्वी इथली विषमतावादी समाजव्यवस्था आणि न्याय व्यवस्थेची जाणीव असल्यामुळे, ब्रिटिशांनी आधी एक घटना तयार करण्याची सूचना केली होती.त्यानुसार या देशाचा कारभार , शासन व्यवस्था चालविण्यासाठी एक नियमावली असण्याची आवश्यकता ओळखून राज्यघटना निर्मितीची कल्पना पुढे आली. आणि दोन वर्षे अकरा महिने अठरा दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर भारतातील विविध धर्म-जाती त्यांच्या रुढी, परंपरा,भाषा, संस्कृती आदींच्या स्वातंत्र्याचा सर्वांगानी विचार करून भारतीय संविधानची निर्मिती झाली.आणि अखेर त्या राज्यघटनेवर सर्वांगानी सखोल चर्चा करण्यात आल्यानंतर त्या संविधान सभेच्या माध्यमातून भारतातील तमाम जनतेला उद्देशून बोलताना विश्वरत्न बाबासाहेब डॉ.भीमराव आंबेडकर यांनी निक्षून बजावले होते. की, आपले ''संविधान'' हे जगातील आदर्शवत असे संविधान असले तरी ते अंमलात आणणा-यांची मानसिकता तमाम जनतेच्या सर्वांगिण हिताची नसेल, मूठभर भांडवलदारांना लाभ होईल अशा चुकीच्या पद्धतीने त्याचा वापर होत असेल तर हे संविधान कितीही चांगले असले तरी ''संविधान'' निष्फळ ठरणार हे निश्चित समजा. बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकरांनी दूरदृष्टीने केलेले भाकीत दुर्दैवाने आज तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे. त्यानंतरही अनेकांनी मांडलेल्या सूचना आणि विचार ऐकून सर्वांच्या संमतीने शिक्कामोर्तब झाल्यावर २६ जानेवारी १९५० ला हे संविधान विधीवत लागू करण्यात येऊन ती प्रजेची सत्ता म्हणून अंमलात आणण्यास सुरुवात झाली .म्हणून हा दिवस प्रजासत्ताक दिन अर्थात गणराज्य दिन म्हणून मोठ्या उत्साहाने संपूर्ण भारतभर साजरा केला जावा हे अपेक्षित आहे. पण वास्तवात असं ब-याच ठिकाणी जाणीवपूर्वक घडत नाही. ज्याप्रमाणे १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला जातो त्या दिवशी स्वातंत्र्याचा लढा, इतिहास,देशासाठी बलिदान दिलेल्यांचे स्मरण करून गुणगान केले जाते त्याचप्रकारे २६ जानेवारी या आपल्या प्रजासत्ताक दिनी देखील भारतीय संविधानावर सविस्तरपणे सार्वजनिक चर्चा केली पाहिजे आणि घटनेचे निर्माते-शिल्पकार बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकरांचे स्मरण केले पाहिजे,परंतु दुर्दैवाने आपल्या देशात निदान प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने का होईना भारतीय संविधानाची चर्चा घडवून आणली जात नाही.

सर्वप्रथम, धार्मिक सत्तेला प्रमाण मानणा-यांना समतावादी बाबासाहेब आंबेडकर अजिबात आवडत नव्हते आणि आजही त्यांचे तत्वज्ञान आणि बुद्धिमत्ता संपूर्ण जगाने एकमुखी मान्य केलेली असतानाही इथल्या सनातनींना ते पचनी पडत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. कारण त्यांच्या एकूणच विचारसरणी नुसार भारतीय संविधानामुळे त्यांचे विशेष अस्तित्व धोक्यात येणार हे त्यांनी आधीच हेरले होते.म्हणून तर सर्व शक्ती एकवटून त्यांच्या संविधान समितीवरील निवडीलाही प्रचंड विरोध करण्यात आला होता. त्यांची संविधान समितीवरील निवड आणि मसुदा लेखन हा एक स्वतंत्र विषय होऊ शकतो त्याची आता चर्चा करण्यासाठी हा लेखनप्रपंच नाही.

२६ जानेवारी रोजी कुठलीही लढाई झाली नाही की त्या दिवशी कुणीही शहीद झाले नाही.तरिही जाणीव पूर्वक संविधान निर्मिती त्याची ओळख आणि महत्व विशद न करता शहीदांची गाणी वाजवून,बलिदानाचे संदेश पाठवून बेगडी देशभक्तीचे प्रदर्शन केले जाते.इतकेच नव्हे तर काही ठिकाणी जिथे राष्ट्र ध्वज फडकावला जातो त्या स्तंभाभोवती आपल्या देशाने धर्मनिरपेक्ष तत्वप्रणाली स्वीकारलेली असतानाही एका विशिष्ट धर्माशी संबंधित असलेली सत्यनारायणाची पूजा मांडली जाते हे दुर्दैवी आहे. अशा प्रकारच्या अंध भक्तीमुळे आपण आपल्या भारतीय प्रजासत्ताक गौरवाला तिलांजली देणा-या कुटिल कारस्थानाला हातभारच लावत आहोत हे वेळीच लक्षात घ्यावे. ही कुप्रथा थांबवण्यासाठी भारतीय संविधान सर्वांनी समजून घेणे गरजेचे आहे. भारताचे सार्वभौमत्व, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा सन्मान राखण्यासाठी एकसंध झाले पाहिजे.गणराज्य दिनी केवळ आणि केवळ संविधानाचे महत्व प्रसारित करून संविधान प्रती जनतेत जागृती निर्माण करण्यात आली पाहिजे. भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी प्रस्थापित केलेल्या मानवी मूल्यांना आत्मसात करण्याचा संकल्प करण्याची सार्वजनिक प्रतिज्ञा सर्वांनी घेऊन लोकशाही समाजव्यवस्थेचा प्रचार करुन. गणराज्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केले पाहिजे.आपले भारतीय संविधान हेच आपल्या देशाचा आणि आपण देशवासियांचा आत्मसन्मान आहे हे कदापि विसरु नये.विशेष म्हणजे आपल्याकडे प्लॅस्टीकच्या वापरावर पूर्ण बंदी असूनही दर वर्षी स्वातंत्र्यदिनी आणि प्रजासत्ताकदिनी प्लॅस्टीकचे तिरंगा ध्वज मिरविण्याची साथ मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्या दोन्ही राष्ट्रीय उत्सवांच्या दुस-याच दिवशी मिरवलेल्या राष्ट्र ध्वजांची रस्तरस्ती काय अवस्था झालेली असते ते आपण सर्वजण दरवर्षी पाहत,अनुभवत.त्यामुळे प्लॅस्टीकच्या ध्वज निर्मिती-विक्री वर सक्तीने बंदी घातली पाहिजे.

संविधान सभेने मान्य केलेला आपला तिरंगा ध्वज हा भारतीयांचा अभिमानच नव्हे,तर प्राण आहे. ह ! या तिरंग्यासाठी आपल्या पूर्वजांनी अक्षरशः लाठ्या खाल्लया होत्या. जिवाची बाजी लावली होती.परंतु हातातील ध्वज जमिनीला लागून दिला नव्हता. आजही तिरंग्याची शान राखण्यासाठी आपले जवान भारताच्या सीमेवर डळ्यात तेल घालून रक्त गठविणा-या हवामानात ऊन वारा थंडी पाऊस याची पर्वा न करता बर्फाळ प्रदेशात दिवस-रात्र खडा पहारा देत असतात.आणि इथे स्वातंत्र्याला स्वैराचार मानून हुंदडणारे

विदेशी वस्तू वापरण्याची लत लागलेले,कुठलेही नियम,निर्बंध न पाळणारे अनुकरण वृत्तीचे हवसे नवशे गवसे भारतीय भले अमेरिकेतील लक त्यांच्या राष्ट्रध्वजाचे मानक चित्र असलेल्या कापडाच्या चड्ड्या बनियान बनवून घालत असले तरी आपण भारतीय मात्र त्यांचे अनुकरण करता कामा नये हे ध्यानात ठेवले पाहिजे. प्रशासनाने देखील असे प्लॅस्टिकचे ध्वज तयार केले जाणार नाहीत,विकले जाणार नाहीत याकडे वेळीच दक्षता पूर्वक लक्ष देऊन अशांवर कडक कारवाई केली पाहिजे. भारताचा एक सच्चा नागरिक या नात्याने सर्वांना विनंती करावीशी वाटते की, सर्व भारतीयांनी केवळ प्रजासत्ताक दिनी नव्हे तर सदैव आपल्या संविधानाचा योग्य असा सन्मान तर राखलाच पाहिजे.त्याच बरोबर प्लॅस्टिकचे राष्ट्र ध्वज कुणी विकतही घेऊ नये.अथवा कुणी दिले तरी त्याचा वापर करु नये.तसेच आपल्या मित्र मैत्रिणींनाही अशा तिरंगा ध्वजांचा वापर करण्यापासून रोखून राष्ट्र ध्वजाचा अपमान हण्यापासुन वाचवावे. इतकेच.

**विठ्ठलराव वठारे**
**अध्यक्ष,**
**जन लेखक संघ, महाराष्ट्र.**
joshaba1001@gmail.com

# ''समाजसेवेचा आदर्श: रोहन सुरवसे पाटील यांचा वाढदिवस''

आज 'रुग्णहक्क जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट'चे अध्यक्ष श्री. रोहन सुरवसे पाटील यांचा वाढदिवस असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ट्रस्टने समाजात माणुसकीचा दीप प्रज्वलित केला आहे. गरजूंसाठी देवदूत ठरणाऱ्या या ट्रस्टची स्थापना २०२१ साली रोहन आणि शिवानी रोहन सुरवसे पाटील या दाम्पत्याने केली. समाजसेवेच्या कार्यात हा ट्रस्ट एक नवीन आदर्श ठरला आहे, ज्यात रुग्ण, विद्यार्थी आणि गरजू व्यक्तींसाठी अनंत सेवा राबवण्यात येतात. रोहन आणि शिवानी या दांपत्याने स्वतः गरिबीचा अनुभव घेतल्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी लागणाऱ्या अडचणींची खरी जाणीव त्यांना आहे. ''एकेकाळी आमच्याकडे रुग्णालयात जाण्यासाठी ५०० रुपयेही नव्हते,'' असे सांगताना रोहन सुरवसे पाटील भावूक होतात. या अनुभवातूनच समाजातील इतर गरजवंतांची मदत करण्याची प्रेरणा मिळाली आणि 'रुग्णहक्क जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट'चा जन्म झाला.

स्थापनेपासून आतापर्यंत ट्रस्टने २० हजारांहून अधिक रुग्णांना वैद्यकीय मदत देत त्यांच्या उपचारात सहकार्य केले आहे. रक्तदान शिबिरे, मोफत नेत्रतपासणी शिबिरे, आरोग्य शिबिरे, ज्येष्ठ नागरिक कट्टा यांसारख्या विविध उपक्रमांनी ट्रस्ट समाजातील आरोग्य आणि कल्याणामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. शिक्षण क्षेत्रातही गरजवंत विद्यार्थ्यांना मदत करून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हा ट्रस्टचा प्रमुख उद्देश राहिला आहे.

आज व्यवसाय, समाजकारण आणि राजकारणात व्यस्त असलेल्या रोहन सुरवसे पाटील यांचे ट्रस्टचे दैनंदिन कामकाज पत्नी शिवानी सुरवसे पाटील अत्यंत निष्ठेने सांभाळतात. ट्रस्टच्या कार्यात 'नाही' हा शब्द क्वचितच येतो. कोणतीही अडचण असो रोजगार, शासकीय कामे, आधार



कार्ड, जन्मदाखला किंवा रहिवासी प्रमाणपत्र गरजू व्यक्तीला मदत मिळतेच, हे त्यांच्या प्रयत्नांचेच फळ आहे. विशेष म्हणजे, ट्रस्टच्या माध्यमातून १३०० पेक्षा अधिक तरुणांना आयटी क्षेत्रात रोजगार मिळवून देण्याचे कार्यही शक्य झाले आहे. रोजगार मेळावे, मार्गदर्शन शिबिरे यांमधून तरुणांना नवी दिशा मिळत असून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला जात आहे.

आजच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ट्रस्टद्वारे मदत मिळालेल्या असंख्य नागरिकांकडून रोहन सुरवसे पाटील यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. परंतु, रोहन सुरवसे पाटील यांच्या मते समाजसेवा ही प्रसिद्धीसाठी नव्हे, तर गरजूंच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानाचा अनुभव घेण्यासाठी असते. हेच समाधान 'रुग्णहक्क जनसेवा चॅरिटेबल ट्रस्ट' प्रत्येक उपक्रमात साध्य करत आहे.

आज रोहन सुरवसे पाटील यांचा वाढदिवस केवळ त्यांच्या वैयक्तिक जीवनाचा उत्सव नाही, तर समाजात माणुसकीची झळकणारी ज्योत जागृत करणारा दिवस आहे. गरजूंसाठी, रुग्णांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि तरुणांसाठी त्यांनी उचललेली पावले समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहेत. या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याची प्रशंसा आणि शुभेच्छा व्यक्त करताना असे वाटते की, खऱ्या अर्थाने देवत्व अनुभवायचे असेल, तर ते माणुसकीच्या सेवेतूनच शक्य आहे.

रोहन सुरवसे पाटील आणि त्यांच्या ट्रस्टने समाजात निर्माण केलेले आदर्श हे आपल्याला दाखवते की, ''रुग्णांची मदत हीच खरी ईश्वरसेवा'' आणि समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीला आधार देणे हे खरे मानवतेचे दर्शन आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त, आपणही समाजसेवेच्या या प्रवासात प्रेरणा घेऊ शकतो आणि गरजूंसाठी थोडा वेळ, थोडी मदत देऊन जगात माणुसकीची जळालेली ज्योत पसरवू शकतो.

**विलास गायकवाड**
**अकलूज**

# वात्रटिका

मुंब्र्यातील रंग

हिरव्या भगव्याच्या वादात
उगाच ओढला तीने मुंब्रा...
आगीत तेल ओतून त्यानेही
बिनधोक ओलांडला उंबरा...।।

दरी मिटली पाहिजे ही
तुमची आमची आशा आहे...
वाद पेटतच ठेवून काहीतरी
फायद्याची त्याला प्रतिक्षा आहे...।।

# गुरु तेगबहादूर सिंग:धर्म,मानवी अधिकार रक्षण करणारे विरक्त आद्यत्मवीर...

१)प्रस्तावना: भारतीय संस्कृतीमध्ये देश आणि धर्मासाठी आणि अखंड मानव कल्याणासाठी व मानवी हक्क आणि सुरक्षेच्या रक्षणाकरिता स्वतःच्या प्राणाची ही परवा न करता आत्मबलिदान देणारे व आपल्या कर्तृत्वातून शिकवण व तत्त्वज्ञानातून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण करणारे अनेक महापुरुष जन्मास आले. भारतीय संस्कृती ही जगभरामध्ये सौदार्यपूर्ण व्यवहार करणारी आणि सर्वसमावेशकतेचा आदर्श ठेवणारे विश्वबंधुत्वाची जननी आहे.

भारताच्या मध्ययुगीन इतिहासामधील सत्ता आणि धर्म संघर्ष यातून निर्माण झालेली प्रादेशिक अस्मिता, राजवटी उदयास आल्या यातून भारतीय संस्कृतीचा समन्वयवादी दृष्टिकोन विकसित होत गेला.

मध्ययुगात भक्ती चळवळीचा प्रचार व प्रसार होत होता. उत्तर भारतामध्ये धर्माचा जीवनवादी दृष्टिकोन, निर्गुण एकेश्वरवादी विचार ,मानवता ,विवेकवाद,गुरुग्रंथसाहेब शिकवणुकीस प्रमाण मानून त्यातील उपदेशाचे गेय पद्धतीने सिमरन (स्मरण)करत धर्म आणि मानवाचे रक्षणासाठी कार्य करणारा एक विचार आचार प्रवाह म्हणजे गुरू नानक देव यांनी स्थापन केलेला शीख धर्म होय .

शीख धर्मास दहा गुरूंची उत्तुंग अशी परंपरा लाभलेली आहे. अध्यात्मिक जागृती ,नैतिक मानवी मूल्यांची जपणूक करत, ईश्वराचे निराकार स्वरूप साक्षी मानून शीख धर्मच्या गुरूंनी अविरत कार्य केले.तत्कालीन कालखंडातील मुघल सम्राटांनी या मानवतावादी शिकवणी मुळे प्रसारित होणाऱ्या शीख धर्माच्या गुरूंना प्रतिरोध केला. यासाठी त्यांनी गुरुंन बरोबरच सामान्य जनतेवर देखील अनन्वित अत्याचार ,अन्याय केला. शास्त्राचा उपयोग करून कट्टरवादी विचार अधिक घट्ट करण्याचा हेका ठेवला. यास प्रत्युत्तर म्हणून पाचवे गुरु अर्जुनदेवसिंग यांनी आध्यत्मिकते बरोबर जनरक्षण आणि धर्म रक्षणावर भर दिला.त्या नंतर सहावे गुरू हरगोविदसिंग यांनी ''पिरी'' आणि ''मिरी'' या संकल्पनेतून धर्मरक्षक तलवार ही संकल्पना जनमानसात रुजवली. आद्यात्मिक रक्षणासाठी ''पिरी'' तलवार जणरक्षण करण्यासाठी ''मिरी तलवार ही संकल्पना रुजवली.

याच गुरू परंपरेतील एक तेजस्वी गुरु तेगबहादूर सिंग (१६२११६७५) हे अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. म्हणूनच इतिहासात त्यांना ''हिंद दी चादर'' म्हणजे हिंदू धर्माचे संरक्षण करणारे महान बलिदानी असे गौरवले जाते. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे मध्ययुगीन भारतातील सामाजिक-धार्मिक संघर्षाचे जिवंत साक्ष्य आहे.

२)गुरु तेगबहादूर सिंग यांचे पूर्वायुष्य: गुरु तेगबहादूर सिंग यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु गुरु हरगोबिंद सिंग यांचे कनिष्ठ पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव शांत, अंतर्मुख आणि वैराग्यशील होता. युद्धकौशल्य, शस्त्रविद्या यांचे प्रशिक्षण त्यांनी घेतले असले तरी त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे अधिक होता. त्यांनी दीर्घ काळ ध्यान, तपस्या आणि आत्मचिंतनात घालवला.गुरु तेगबहादूर सिंग यांची वृत्ती ही विरक्त, आद्यत्मिक, वीर वृत्तीची होती.

३) गुरु तेगबहादूर सिंग यांचे धार्मिक शिकवण आणि तत्त्वज्ञान व साहित्य : त्यांची शिकवण ही निर्गुण भक्ती परंपरेशी निगडित आहे. संसार नश्वर आहे, ईश्वर निराकार आहे, अहंकार, लोभ व मोह हे बंधनाचे मूळ आहेत, नामस्मरणातून मुक्ती प्राप्त होते हे त्यांचे मूळतत्व आहे. त्यांच्या साहित्यामधील ११५ शबद श्री गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. ही रचना विविध रागांमध्ये असून त्यामध्ये वैराग्य, आत्मज्ञान आणि जीवनाची क्षणभंगुरता प्रकर्षाने आढळते.

गुरुबानी उदाहरण : (शरीर, धन आणि कुटुंब सर्व मिथ्या आहेत.) त्यांची भाषा साधी, पण अर्थगर्भ आहे. अलंकारांपेक्षा तत्त्वज्ञानात्मक आशय त्यांच्या काव्याताप्रधान आहे.

४)औरंगजेब व मुघल सत्तेशी संघर्ष: मुघल सम्राट औरंगजेब याची धार्मिक नीति कट्टर इस्लामी होती. त्याच्या कारकिर्दीत मंदिरध्वंस, जिझिया कर आणि जबरदस्तीचे धर्मांतर वाढले.

औरंगजेबाच्या काळात हिंदूंवर, विशेषतः काश्मिरी पंडितांवर जबरदस्तीने धर्मांतर लादले जात होते.काश्मिरी पंडितांनी आपले धार्मिक स्वातंत्र्य वाचवण्यासाठी गुरु तेगबहादूर सिंग यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुढाकार घेतला. त्या वेळी त्यांनी औरंगजेबास स्पष्ट संदेश दिला की, ''जर मला इस्लाम स्वीकारायला भाग पाडले, तरच इतरांनी धर्मांतर करावे.'' औरंगजेबाला मात्र शेवटपर्यंत गुरू तेगबहादूर यांचे धर्मांतर करून त्यांना इस्लाम मध्ये परावर्तित करणे शक्य झाले नाही.

औरंगजेबाने त्यांच्या या भूमिकेस अत्यंत द्वेषाने व कट्टरतेने उत्तर दिले व त्यांच्या दोन सहकाऱ्यांबरोबरच गुरू तेगबहादूर यांची ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात अनन्वित अत्याचार करून क्रूर हत्या करण्यात आली.

गुरु तेगबहादूर सिंग यांचे हे बलिदान मानवी अधिकार व धार्मिक स्वतंत्र्य रक्षणासाठीचे प्रतीक आहे. त्यांचे हे बलिदान केवळ हिंदू धर्मासाठी नव्हते, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी होते. म्हणूनच त्यांचे बलिदान हे ''धर्मरक्षण'' या संकुचित अर्थापलीकडे जाऊन मानवी अधिकारांचे रक्षण ठरते यातून व्यापक अशी असलेली .''हिंद दी चादर'' उपाधी आणि संकल्पना समाजात रुढ झाली.

५) धर्मरक्षण व मानवी अधिकारांचे संरक्षण: गुरु तेगबहादूर सिंग यांचे बलिदानाने ''हिंद दी चादर'' ही संकल्पना हे इतिहासातील मानवी अधिकारांसाठी दिलेले पहिले संघटित बलिदान मानले जाते. त्यांनी धर्म म्हणजे केवळ पूजा-पद्धती नव्हे, तर स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि विवेक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांचा विचार आधुनिक '' '' या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

६)समकालीन प्रस्तुतता: आजच्या जागतिकीकरणाच्या युगात धार्मिक असहिष्णुता, मुलतत्ववाद आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन वाढताना दिसते. अशा वेळी गुरु तेगबहादूर सिंग यांचे विचार अधिकच समकालीन ठरतात. त्यांचे जीवन हे धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि नैतिक धैर्य यांचे आदर्श उदाहरण आहे. त्यांच्या प्रेरणेतू त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. आजही शीख समाजात त्यांचे बलिदान न्याय व सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देते.

गुरु तेगबहादूर सिंग हे केवळ शीख धर्माचे गुरु नव्हते, तर मानवतेचे महान रक्षक होते. ''हिंद दी चादर'' म्हणून त्यांचे बलिदान आजही धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांचे सर्वोच्च प्रतीक आहे. त्यांचे तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे भारतीय संतपरंपरेतील अमूल्य वारसा असून, समकालीन समाजासाठी ते सदैव प्रेरणादायी राहील.

**लेखक:-**
डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर
विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर
मोबाईल क्रमांक: ९९२२५२०९८५
Email ID: prabhakarkolekar@gmail.com

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटिंग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३

फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.

It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. RNI No . MAHMAR 2006/17624

# आरोग्य व कायदा यांचा संगम साधणारे शिबिर उत्साहात संपन्न

बार्शी (कटूसत्य वृत्त):- श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. बी. वाय. यादव साहेब व खजिनदार श्री बापू शितोळे सर , राजर्षी शाहू लॉ कॉलेज, बार्शीचे प्राचार्य प्रा. डॉ. रत्नदीप सोनकांबळे आणि श्री सत्य साईबाबा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. सुधीर अन्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सत्य साईबाबा मेडिकल ट्रस्ट व राजर्षी शाहू लॉ कॉलेज, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य शिबिर व कायदा-जनजागृती अभियान यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमास राजर्षी शाहू लॉ कॉलेजच्या मा. प्रा. सौ. माया मिठ्ठा, प्रा. सौ. हरदाडे, प्रा. ड. अनिकेत तायडे, प्रा. समाधान काळे, ग्रंथपाल श्री संभाजी शेळके तसेच श्री सत्य साई मेडिकल ट्रस्टचे डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मोठ्या संख्येने नागरिक, वृद्ध व गरजू व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिरामध्ये विविध



आजारांवरील आरोग्य तपासण्या, प्राथमिक उपचार तसेच आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला.

यासोबतच नागरिकांना मूलभूत हक्क, कर्तव्ये, मानसिक आरोग्य कायदा आणि कायदेशीर जनजागृती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश केवळ वैद्यकीय सेवा किंवा कायदेशीर माहितीपुरता मर्यादित न राहता, आरोग्य व न्याय यांचा परस्पर संबंध समाजासमोर प्रभावीपणे मांडणे हा होता. शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ नागरिकच आपल्या हक्कांची जाणीव ठेवून कायद्याचा योग्य वापर करू शकतो, या भूमिकेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी प्राचार्य प्रा. डॉ. रत्नदीप सोनकांबळे यांनी संविधानातील कलम २१ - जीवन व सन्मानाने जगण्याचा हक्क आणि राज्य धोरण निर्देशक तत्त्वांतील कलम ४७ - सार्वजनिक आरोग्याची जबाबदारी यांचा संदर्भ देत आरोग्य हे न्यायप्रक्रियेचे भक्कम अधिष्ठान असल्याचे स्पष्ट केले.

विद्यार्थी डॉ. आनंद मोरे यांनी आरोग्य, कायदा आणि राष्ट्रनिर्मिती : Health Impact -Assessment of Laws (HIA) या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, आरोग्यम् धनसंपदा हा विचार वैयक्तिक नसून न्यायव्यवस्थेचा आत्मा आहे.

ज्या समाजात आरोग्याचा हक्क सुरक्षित नाही, तेथे न्यायव्यवस्था केवळ कागदावर उरते.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राजर्षी शाहू लॉ कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी स्वयंसेवक म्हणून सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या सेवाभावाचे व सामाजिक भानाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

राजर्षी शाहू लॉ कॉलेज, बार्शी हे केवळ Fundamental Rights शिकवणारे नव्हे, तर Directive Principles of State Policy कृतिशील उपक्रमांतून समाजात उतरवणारे शैक्षणिक संस्थान असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले. आरोग्य, विवेक, कायदा व करुणा यांच्या समन्वयातून सुदृढ समाज व सशक्त राष्ट्रनिर्मितीचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# हळदी कुंकू सण हा महिलांच्या मैत्री आणि आनंदाचे प्रतिक- सोनल केत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- हळदी कुंकू हा एक पारंपारिक सामाजिक सोहळा आहे.सुवासिनी एकमेकींना हळद कुंकू लावुन सौभाग्यासाठी शुभेच्छा देतात.मकर संक्रातीच्या काळात महिला एकत्र येऊन हा आनंद साजरा करतात.हा समारंभ महिलांच्या मैत्री आणि आनंदाचे प्रतिक आहे.असे मत सोनल केत यांनी व्यक्त केले. साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्थेच्यावतीने महिला



सभासदांसाठी हळदी कुंकू व तिळगुळ समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासतीठावर नगरसेविका विजयाताई खरात,ज्ञानेश्वरी संगीतराव, आयेशा बिराजदार, महादेवी पाटील,फरजाना मरतुरे आदी उपस्थित होते.

यावेळी नगरसेविका विजयाताई खरात, ज्ञानेश्वरी संगीतराव यांनी आपल्या मनोगतामधुन हळदी कुंकू समारंभाचे महत्व विषद केले. उपस्थित महिला सभासदांना यावेळी पतसंस्थेच्यावतीने भेटवस्तु देण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संध्या सरवदे यांनी तर महादेवी पाटील यांनी आभार मानले.यावेळी महिला सभासद बहुसंख्येने उपस्थित होते.

# मोक्का सारख्या गुन्ह्यांतील २ आरोपींना अटकपूर्व तर ७ आरोपींना रेग्युलर जामीन मंजूर

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- सहा महिन्यांपूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यात मोहोळ पोलिसांनी १२ जानेवारी २०२६ रोजी भारतीय न्याय संहितेचे संघटीत गुन्हेगारीचे कलम १११ वाढविलेल्या गुन्ह्यांत सोलापूर येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी दोन आरोपींना अटकपूर्व तर अटकेत असलेल्या ७ आरोपींना जामीन मंजूर केला. सतीश अशोक पवार, सुनिल अशोक पवार (रा. वैराग ता. बार्शी) अशी अटकपूर्व तर दानिश लियाकत कुरेशी, मोहम्मद लियाकत कुरेशी, शहाबाज अबूतालीब कुरेशी, तौफिक अबूतालीब कुरेशी, इरफान इकबाल कुरेशी, दस्तगीर कोंडाजी कुरेशी आणि अरबाज अफजल कुरेशी (सर्व रा. मोहोळ ता. मोहोळ) अशी जमीन मंजूर झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मोहोळ पोलिसांनी ५ जुलै २०२५ रोजी १३ जणांच्या विरोधात गु.र.नं. ७४४/२०२५ हा गुन्हा दाखल केला होता.

गुन्हा दाखल झाला त्यावेळी या गुन्ह्यात सात वर्षा पर्यंत शिक्षा असलेली कलमे लावण्यात आलेली होती. परंतु त्यानंतर मोहोळ पोलिसांनी तब्बल सहा महिन्यांनंतर, १२ जानेवारी २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता संघटित गुन्हेगारीचे कलम १११ वाढवून वरील सात आरोपींना या गुन्हाकामी अटक केली होती.

या प्रकरणात सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात संशयित आरोपी सतीश अशोक कुरेशी व सुनील अशोक कुरेशी यांनी अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज केलेला होता.

या जामीन अर्जावर सुनावणी वेळी आरोपीचे वकील ड. इरफान पाटील यांनी पोलिसांनी चुकीच्या पद्धतीने हे कलम वाढवले असून हे कलम या गुन्ह्याला लागू होत नाही, सदरचा गुन्हा हा संघटित गुन्हेगारीच्या व्याख्येत बसत नाही असा युक्तिवाद केला व सोबत सर्वोच्च न्यायालयाचे न्यानिवाडे सादर केले. सदरचे ड. इरफान पाटील यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोजकुमार शर्मा यांनी शुक्रवारी वरील आरोपींना अटकपूर्व जमिनी मंजूर करण्याचा आदेश केला.

या प्रकरणात आरोपी तर्फे ड. इरफान पाटील, ड. रियाज शेख सोलापूर, ड. दादाराव पवार, ड. दत्ता वाघमोडे, ड. इमरान पाटील, ड. तौफिक सरकाझी, ड. सोनल जानराव आदींनी काम पाहिले आहे.

# पंढरपूर मंदिर ते महाद्वार चौक परिसरात वाहन प्रतिबंध क्षेत्र घोषित

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- माघ यात्रेसाठी अंदाजे ३ ते ४ लाख भाविक पंढरपूरमध्ये दाखल होणार असल्याने गर्दी व्यवस्थापन व अपघात टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. माघ शुद्ध एकादशी निमित्त पंढरपूर येथे भरणाऱ्या माघ यात्रा सोहळ्यासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची सुरक्षितता, दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक २६ व २७ जानेवारी २०२६ कालावधीत सकाळी ५ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत व दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी रात्री ००.०० पासून ते दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत पंढरपूर शहरातील मंदिर परिसर ते महाद्वार चौक परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कलम ३४ (ब) अन्वये वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे.

या आदेशानुसार पुढील कृतीस मनाई करण्यात येत आहे.

श्रीकृष्ण मंदिर, चौफाळा ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदिर परिसर व पुढे महाद्वार चौक परिसर हा भाग दुचाकी, चारचाकी व इतर सर्व वाहन चालवणे तसेच पार्किंग करणे.

मंदीर परिसरात छोट्या छोट्या अरुंद रस्त्यावर वाहने लावणे.

या आदेशातून खालील वाहनास सूट देणेत येत आहे.

शासकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, मंदीर परीसरात राहणारे, मंदीरात कामकाज करणारे व्यक्तींचे वाहनांसाठी पोलीस प्रशासनाकडून पास प्राप्त झालेनंतर सदरच्या आदेशातून सूट राहील. तथापि, शासकीय कर्तव्य, मंदीरातील कर्तव्य याशिवाय इतर बाबीसाठी शासकीय व मंदीर समितीचे वाहन, कर्मचारी वाहन याचा वापर केला जाणार नाही, अन्यथा कडक कारवाई केली जाईल. या कालावधीमध्ये याठिकाणी येणाऱ्या भाविकांच्या वाहनाची पार्कंग व्यवस्था पंढरपूर नगर परीषदेमार्फत करणेत यावी. सर्व गल्ली बोळातून दुचाकी येणार नाही, यासाठी नगर परीषद यांनी बॅरीकेड्स लावणेत यावेत. याबाबत नगरपरीषदेने व्यापक प्रसिध्दी द्यावी. मंदीर परीसरात राहणारे, कामकाज करणारे व्यक्तींकरीता नमुद कालावधीसाठी पास देणेची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. पासधारक व्यक्तींना त्यांचे वैयक्तीक कारणासाठी मुभा राहणार नाही, अन्यथा कडक कारवाई केली जाईल.

मंदीर समिती कर्मचारी व पोलीस कर्मचारी पास घेतील व त्यांना ठरवून दिलेल्या जागेतच वाहन पार्कींग करतील.

मंदीर परिसरात व्यवसाय करणारे व्यावसायिकांचे मालाची ने-आण करणेकामी पोलीस प्रशासन यांनी त्यांचेशी चर्चा करुन भाविकांची गैरसोय होणार नाही, अशी ठराविक वेळ निश्चीत करुन त्यादरम्यान अशी वाहतूक होईल, याची खबरदारी घ्यावी.

महत्वाचे तसेच राजशिष्टाचार पात्र व्यक्तींसाठी तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदीर समितीने श्रीकृष्ण मंदीर, चौफाळयापासून ने-आण करणेकामी पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था करावी. पंढरपूर शहर पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे होणेचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करणेत यावी. तसेच आदेशाचा भंग करणारे यांचेविरुध्द आदेशात नमूद कायद्यान्वये कारवाई करणेत यावी. त्या अनुषंगाने वाहन प्रतिबंध क्षेत्रामध्ये अनाधिकृतपणे वावरणाऱ्या वाहनावर जप्तीची कारवाई करुन सदर वाहने पोलीस स्टेशन पंढरपूर येथे दंडात्मक कारवाईसाठी जमा करण्यात यावी. तसेच सदर वाहनावर मोटार वाहन कायदा १९८८ मधील तरतुदीनुसार मोठ्या रक्कमेची दंडात्मक कारवाई अनुसरण्यात यावी. सदर रक्कम वाहनधारकांकडून रोखीने वसुल करण्यात यावी. दंडात्मक कारवाईची संपूर्ण रक्कम वसूल झाल्याशिवाय सदरील वाहन कार्यमुक्त करण्यात येवू नये. दंडात्मक रक्कमेची वसूली केलेल्या वाहनांची माहिती (अहवाल) तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी पंढरपूर यांचेकडे दर सोमवारी सादर करण्यात यावा.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन झालेस उल्लंघन करणारेविरुध्द राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ अन्वये कारवाईस पात्र राहिल असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कुमार आशीर्वाद यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महापालिकेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त सुभाष उद्यान पाच्छा पेठ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सोलपूर महानगरपालिकेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त



व शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील मा आयुक्त यांच्या कार्यालयात नेताजी सुभाष चंद्र बोस व शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी गटनेते चेतन नरोटे,विभागीय अधिकारी गायधनकर कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजित कुमार खानसुळे, श्रीगणेश बिराजदार, विजय पुकळे, शंकर माने सिद्धू तिमीगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

# हिंद दी चादर शहीदी समागमात जनकल्याण चिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड, (कटूसत्य वृत्त):- हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या स्थळी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने उभारण्यात आलेल्या जनकल्याण चिकित्सा शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेत आहेत. या शिबिरात पहिल्या दिवशी भाविकांची उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग यांसह विविध आजारांची तपासणी करून आवश्यक उपचार करण्यात येत आहेत. तसेच औषधे, काठ्या, कृत्रिम अवयव व चष्म्यांचे वाटप करण्यात येत असून हजारो नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेत आहेत. या शिबिरात श्री गुरु ग्रंथ साहिब सेवा संस्थेच्या गुरु का लंगर डोळ्याचा दवाखानाच्या वतीने भरीव सहभाग देऊन योगदान देत आहेत.

कार्यक्रमाचा सर्व भाविकांना सहज लाभ घेता यावा यासाठी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

कार्यक्रमाचा सर्व भाविकांना सहज लाभ घेता यावा यासाठी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण रंगमंच परिसरात तसेच इतर दर्शनी भागात, लंगरच्या ठिकाणी स्क्रीनिंगच्या माध्यमातून करण्यात येत आहे. यासोबतच कार्यक्रमाची लाइव्ह लिंक https://youtube.com/live/-mšofc2n8ig?feature=share उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने नांदेड शहर व परिसरात उत्साहाचे वातावरण असून, देश-विदेशातून



येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन व विविध सामाजिक संघटनांनी आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, स्वच्छता, पिण्याचे पाणी व सुरक्षा, लंगरची व्यवस्था यांसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग व बलिदानाचे स्मरण करून धर्म, मानवता व सहिष्णुतेचा संदेश देणारा हा शहीदी समागम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय
निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आव्हानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.





CHANGE IN NAME

I am changing my name from SHAHAR BANO SHOUKAT SAHAB SALAR TO JABIN YUNNUS MUJAWAR for passport issuance.

CHANGE IN NAME

I am changing my name from SHOUKAT SAHAB SALAR TO SHOUKAT NABILAL SALAR for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायु, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरुध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) दाग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण ४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे ८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) ससाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी १०) हवामानातील उष्मा १२) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** १४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत) १९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे २५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी २७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव ३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया ३२) किमानच्या विरुध्दार्थी ३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको ४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट ४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव- **** कामगार पक्ष ४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच ५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 160

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 3 | | | | | 1 | | |
| | | | | | 2 | 3 | | |
| 1 | | | | 5 | | | | 4 |
| 9 | 8 | | 1 | | 5 | | 7 | 2 |
| 2 | 5 | 7 | 9 | | | | 3 | 1 |
| 6 | 1 | 3 | 7 | 2 | 8 | | 4 | |
| 4 | 2 | | 5 | | 1 | | | 3 |
| | 7 | 8 | | | 9 | | | 5 |
| | 6 | | 4 | | | | | |

# विकासाचा अजेंडा घेऊन पृथ्वीराज सावंत मैदानात

## मानेगाव गटात गावोगावी उत्स्फूर्त प्रतिसाद

माढा (कटूसत्य वृत्त):- मानेगाव जिल्हा परिषद गटात भाजपच्या प्रचार मोहिमेला वेग आला असून, पक्षाचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज सावंत यांनी गावभेटी व थेट संवादाच्या माध्यमातून प्रचाराची दिशा स्पष्ट केली आहे. मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधत विकासाचा ठाम अजेंडा मांडल्याने संपूर्ण गटात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.



पृथ्वीराज सावंत हे दररोज विविध गावांमध्ये भेटी देत नागरिकांच्या घरी जाऊन संवाद साधत आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शाळा, अंगणवाड्या, शेती व रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर नागरिकांनी आपल्या अपेक्षा मांडल्या. या सर्व समस्या जिल्हा परिषद स्तरावर प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा विश्वास सावंत यांनी दिला.

यावेळी बोलताना सावंत म्हणाले, निवडणूक ही केवळ पदासाठी नसून परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी असते. भाजपचा विचार हा काम करणारा विचार आहे. केंद्र व राज्यातील भाजप सरकारने विकासाची मजबूत पायाभरणी केली असून, त्याचा लाभ ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे. भाजपच्या विकासात्मक धोरणांचा उल्लेख करत त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन, रस्ते व पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील योजनांची माहिती दिली. या योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सक्षम लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. भाजपच्या संघटनात्मक ताकदीवर विश्वास व्यक्त करत सावंत यांनी सांगितले की, अनुभवी नेतृत्व, कार्यकर्त्यांची मजबूत फळी आणि जनतेशी थेट संवाद हीच पक्षाची खरी ताकद आहे. नागरिकांचा विश्वास आणि पाठिंबा मिळत असल्याने विकासाच्या लढाईत आम्ही निश्चितपणे यशस्वी होऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गावभेटी दरम्यान भाजपचे स्थानिक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सावंत यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# विमल ताई खताळ यांच्या प्रचारासाठी महिलांनी खोचला पदर

## कामती गटात भाजपाचा होम टू होम प्रचार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मोहोळ तालुक्यातील कामती जिल्हा परिषद गटातून भाजपच्या अधिकृत उमेदवार विमलताई तानाजीराजे खताळ यांनी गटातील मतदार,नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी होम टू होम जाऊन मतदारांच्या गाठीभेटीवर भर दिला आहे. भारतीय जनता पार्टीच्या सरकारने लोकहिताच्या राबविलेल्या जनहिताच्या योजना,माजी आमदार राजन पाटील यांनी केलेला तालुक्याचा विकास व कामती जिल्हा परिषद गटात स्व.तानाजीराजे खताळ यांनी केलेला शाश्वत विकास या सर्व बाबींची आठवण विमलताई खताळ यांनी नागरिकांना या गावभेट दौऱ्यात करून देण्यात येत आहे.





तसेच सीना नदीला आलेल्या महापुराच्या काळात कामती गटातील गावांचे मोठे नुकसान झाले होते.अनेकांचे संसार उघड्यावर पडले होते.तर अनेकांची.दुभती जनावरे वाहून गेली होती.अनेकांच्या शेतजमिनी पाण्याच्या प्रवाहाने खरडून गेल्या होत्या.अशा कठीण काळात आणि कोरोना महामारीच्या ही कठीण काळात सामाजिक बांधिलकी जपत या गटातील नागरिकांना मोठी मदत केली होती.या सर्व घटनांमध्ये खताळ परिवाराने केलेल्या मदतीची आठवण या गावभेट दौऱ्यात नागरिकांनी सांगितली.व खताळ परिवाराच्या परोपकारी वृत्तीचे कौतुक केले.

**कामती चे भाजपाचे दोन्ही उमेदवार विजयी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष शशिकांत नानांचे मार्गदर्शन**

भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कामती जिल्हा परिषद गटाच्या भाजपाच्या अधिकृत उमेदवार विमलताई तानाजीराजे खताळ व सावळेश्वर पंचायत समिती गणाच्या उमेदवार पार्वती कालिदास गावडे यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी भाजपा बूथ प्रमुखांची बैठक लांबोटी येथे संपन्न झाली. या बैठकीस भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी भाजपाचे दोन्ही उमेदवार विजयी करण्यासाठीचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना केले. यप्रसंगी मोहोळ दक्षिण मंडल अध्यक्ष रमेश माने, मोहोळ उत्तर अध्यक्ष सतीश काळे, कामती जिल्हा परिषद गटाचे युवा नेते अक्षय खताळ , उत्तर मंडल सरचिटणीस अरविंद माने यांच्यासह सावळेश्वर गणातील भाजपा बूथ प्रमुख उपस्थित होते.

# रस्ते–पाणी–वीज ते रोजगारापर्यंत ठोस आराखडा

## चोपडी गटात चेतनसिंह सावंत यांची विकासाची हमी

सांगोला (कटूसत्य वृत्त):- भाजप-शिवसेना-आरपीआय महायुतीकडून चोपडी जिल्हा परिषद गटात चेतनसिंह केदार सावंत हे निवडणूक रिंगणात उतरले असून, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण ते रोजगार या सर्व मूलभूत प्रश्नांवर ठोस आणि कृतीशील विकास आराखडा त्यांनी जनतेसमोर मांडला आहे. विकासाच्या नावाखाली केवळ घोषणा नव्हे, तर प्रत्यक्ष काम करणारे नेतृत्व देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. चोपडी गटातील प्रत्येक गावाचा विकास, प्रत्येक नागरिकाला न्याय हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपण काम करणार असल्याचे सावंत यांनी सांगितले.



कारंडेवाडी (बुद्धेहाळ), कारंडेवाडी ( उदनवाडी), सोमेवाडी, निजामपूर, हणमंतगाव, लोणविरे, नाझरे गावांमध्ये प्रचार दौऱ्यादरम्यान महायुतीचे अधिकृत उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समस्या जाणून घेतल्या, चोपडी गटातील विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल असे त्यांनी सांगितले. चोपडी जिल्हा परिषद गटातील सर्व गावांना पक्के रस्ते, नळाद्वारे शुद्ध पाणीपुरवठा आणि अखंड वीज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा करण्यात येणार आहे. रखडलेली विकासकामे मार्गी लावून नवीन कामांना गती देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि अंगणवाड्यांच्या सुविधा अद्ययावत केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी शाळा दुरुस्ती, मूलभूत सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांच्या उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, स्वयंरोजगार निर्मिती आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. पंतप्रधान आवास योजना व अन्य घरकुल योजनांच्या माध्यमातून प्रत्येक पात्र कुटुंबाला पक्के घर मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सावंत यांनी सांगितले. केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने विकास निधी आणि योजनांचा थेट लाभ चोपडी जिल्हा परिषद गटातील नागरिकांना मिळणार असल्याचा विश्वास महायुतीचे अधिकृत उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला. मी फक्त निवडणुकीपुरता नेता नाही, तर पाच वर्षे जनतेचा सेवक म्हणून काम करणारा प्रतिनिधी असेन. सर्वसामान्यांचा आवाज जिल्हा परिषदेत ठामपणे मांडेन, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महायुतीची ताकद आणि जनतेचा वाढता विश्वास लक्षात घेता, चोपडी जिल्हा परिषद गटात चेतनसिंह केदार सावंत यांच्याकडे विकासाभिमुख नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे.

# कर्मवीर कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिराचे कापसेवाडी येथे उत्साहात उद्घाटन

बार्शी (कटूसत्य वृत्त):- श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय,बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी शिबिराचे उद्घाटन नंदनजी जगदाळे उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,बार्शी व प्रगतशील शेतकरी नितीन बापू कापसे यांच्या हस्ते उत्साहमध्ये पार पडले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून डॉ. राहुल शेळके लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. बी. शिंदे यांनी केले तर डॉ. राहुल शेळके यांनी जैविक द्राक्ष शेती या विषयी मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदनजी जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना शिबीरामध्ये गावामधील श्रमदान, आधुनिक शेती या संदर्भा मध्ये प्रबोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोसाहित केले.

या शिबीरामध्ये दिनांक २४/१/२०२६ ते ३०/२०२६ या दरम्यान विविध समाज उपयोगी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. आरोग्य तपासणी , जनावरांचे लसीकरण, वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी डॉ. शेंडे एस. एस. यांनी केले. या प्रसंगी कार्यालयीन अधीक्षक मोरे टी.एस. , प्रा. आशा आदलिंगे, रवी जगदाळे, गावातील ग्रामस्थ, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# राजकुमार हिवरकर पाटील यांच्याकडे मोहोळ विधानसभा क्षेत्र निवडणूक संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- शिंदे गट शिवसेना ओबीसी चे सोलापूर जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांची जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीची मोहोळ विधानसभा क्षेत्र निवडणूक संपर्कप्रमुख पदी नुकतीच निवड करण्यात आले आहे.शिवसेना उपनेते माजी आमदार संजय कदम यांनी ही निवड केली असून राजकुमार हिवरकर पाटील यांना संपर्क पदाच्या निवडीचे पत्र देण्यात आले.यावेळी राजकुमार हिवरकर पाटील बोलत असताना म्हणाले की माझ्यावर संपर्क पदाची टाकण्यात आलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडून जिल्हा परिषद,पंचायत समिती उमेदवारांना मार्गदर्शन करुन निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवारांचा प्रचार यंत्रणा व्यवस्थित पार पाडून शिवसेना पक्ष,संघटना वाढविण्याच्या दृष्टीने कार्य करण्याचे आश्वासन राजकुमारी वर्कर पाटील यांनी दिले.यावेळी शिवसेना उपनेते माजी आमदार संजय कदम, अण्णा कदम स शिवसेना तसेच युवा सेनेचे जिल्हाप्रमुख नेते मंडळी व पदाधिकारी उपस्थित होते.



# सोलापूरात जिजाऊ सृष्टी आणि पुतळ्यासाठी ठोस प्रयत्नाचे अश्वासन

## मराठा सेवा संघाच्या वतीने नूतन नगरसेवकांचा सत्कार सोहळा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेतून आम्ही सार्वजनिक जीवनात आलो असून समाजबांधवांच्या पाठिंब्यामुळे महापालिकेत नगरसेवक होण्याची संधी मिळाली, असे प्रतिपादन नूतन मराठा समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांनी केले. सोलापूर शहरात राजमाता जिजाऊ यांचा भव्य पुतळा उभारणे तसेच 'जिजाऊ सृष्टी' साकारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.




मराठा सेवा संघाच्या वतीने रविवार दि. २५ जानेवारी रोजी नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्यात उत्तर देताना नगरसेवकांनी समाजाच्या विश्वासाला पात्र ठरण्याचा निर्धार व्यक्त केला. मराठा समाजासह इतर समाजघटकांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच ही यशस्वी वाटचाल शक्य झाली, असेही त्यांनी स्पष्ट केले. समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी सभागृहात काम करणार असल्याचे देखिल सांगितले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक सलोखा जपत काम करणार असून, राजमाता जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी जिजाऊ सृष्टीसारख्या प्रेरणादायी उपक्रमासाठी महापालिकेत ठोस भूमिका घेण्यात येईल, असे आश्वासन नगरसेवकांनी दिले.

मराठा सेवा संघाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रारंभी जिजाऊ वंदना घेण्यात आली त्यानंतर नूतन नगरसेवक जयकुमार माने, अमोल शिंदे, अनंत जाधव, गणेश वानकर, विनोद भोसले, प्रिदर्शन साठे, श्रीध्दा पवार, मृण्यमयी गवळी, ज्ञानेश्वरी देवकर, वैशाली भोपळे, कल्पना कदम, मनोरम सपाटे, पूनम कशिद यांचा जिजाऊ यांची प्रतिमा व बुध्द भूषणम् ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. अमोल शिंदे, गणेश वानकर, विनोद भोसले, अनंत जाधव, जयकुमार माने, कल्पना कदम यांनी विचार व्यक्त करत सत्कारास उत्तर दिले.

कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागिय अध्यक्ष प्रशांत पाटील होते.यावेळी दत्ता मुळे, उज्वाला साळुंखे, सदाशिव पवार, आर. पी. पाटील, प्रकाश ननवरे, हणमंत पवार, नवनाथ चव्हाण, सोमनाथ राऊत, लक्ष्मण महाडिक, दिनकर देशमुख, सचिन चव्हाण गोवर्धन गुंड, प्रकाश डोंगरे, नितीन जाधव, हनुमंत चव्हाण, नितीन मोहिते,नवनाथ कदम,राम माने, परशुराम पवार, स्वाती पवार, लत्ता ढेरे, अभिजंली जाधव, प्रिति कदम उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांबरोबर आत्मविश्वासही वाढवा- मल्हारी माने

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास अधिक बळकट होतो. वार्षिक स्नेहसंमेलन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी केले.



नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाटनप्रसंगी माने बोलत होते. हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी मिळालेले हे व्यासपीठ म्हणजे त्यांच्यासाठी आनंदोत्सवच असून त्यांच्या कलागुणांना नवी दिशा मिळते, असेही माने यांनी नमूद केले.

यावेळी भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महानायक नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या तेजस्वी कार्याचा व जाज्वल देशभक्तीचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नेताजींच्या देशसेवा, देशनिष्ठा व बलिदानाची आठवण करून देत, त्या मूल्यांचे आचरण करण्याचा संकल्प व्यक्त केला. स्नेहसंमेलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसह पालकांचेही यावेळी विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार होत्या. प्रारंभी तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी, नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच स्व. बसवराज कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, केंद्रप्रमुख स्वप्नील चाबुकस्वार, सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, रेवणसिद्ध रोडगीकर, विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार , मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष राजशेखर घंटे, सहसचिवा वैशाली अभंगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सेवानिवृत्त शिक्षक धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी अहवाल वाचनाद्वारे शाळेतील शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशालेय उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. स्नेहसंमेलनात पाचवी ते नववी इयत्तेतील सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी गणेश गीत, शिव तांडव नृत्य, तेलुगू गीत, देशभक्तीपर गीत, छावा, कृष्ण जन्माला, तमिळ नृत्य, गोंधळ गीत, वाघ्या-मुरळी खंडोबा गीत, महाकाली दर्शन - देवी महिमा अशा विविध गीतांवर सादर केलेल्या नृत्यप्रकारांनी प्रेक्षकांची दाद मिळवली व पालकांकडून भरभरून वाहवा मिळवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वराध्य मठपती यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन उमादेवी कुंभार यांनी केले. स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विक्रमी ८३६ ट्रक कांद्यांची आवक

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्री सिद्धेश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी (दि. २४ जानेवारी) कांद्याची विक्रमी आवक झाली. तब्बल ८३६ ट्रक कांद्यांची आवक नोंदवली गेली असून, यंदाच्या हंगामातील ही आतापर्यंतची सर्वाधिक आवक ठरली आहे. आवक प्रचंड वाढल्याने बाजार समिती परिसरात कांदा घेऊन आलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

कांदा उतरवून घेण्यासाठी वेळ लागत असल्याने लिलाव प्रक्रिया उशिराने सुरू झाली. परिणामी व्यापारी, हमाल व शेतकरी यांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. दुसरीकडे, आवक जास्त आणि मागणी तुलनेने कमी असल्याने कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला असून, कमी भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.